# साहित्याचा ई-प्रवाह!

तंत्राशी फटकून राहत कोणतीही कला फार काळ तग धरू शकत नाही. साहित्य कला ही तर मुळी गुटेनबर्ग छपाई तंत्राच्या प्रगतीसोबतच वृद्धिंगत होत गेली. बहरतही गेली. एका मोठ्या कालखंडानंतर अवघे पुस्तकविश्व एका स्थित्यंतरातून जात आहे. हे स्थित्यंतर आहे, डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रसाराचे. ई-बुकच्या रू पाने ही संधी चालून आली असताना  या माध्यमाद्वारे मराठीच्या प्रचार-प्रसाराचे व्रत स्वीकारलेल्या बुक गंगा डॉट कॉम या ऑनलाइन सेवेचे अमेरिकास्थित  मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर यांचे हे मनोगत...

---

**साहित्य संमेलन विशेष**

मंदार मोरेश्वर जोगळेकर

गतिमान कार्यपद्धतीचा अवलंब करून तंत्रज्ञान क्षेत्रात होणारे बदल आत्मसात केले तर नजीकच्या काळात छोट्या गावातील लेखक आपले साहित्य आता ई-बुक स्वरूपात वाचकांपर्यंत उपलब्ध करून देऊ शकेल.

मानवाच्या हजारो वर्षांच्या उत्क्रांतीच्या प्रवासात गेल्या तीस-चाळीस वर्षांतील तंत्रज्ञान क्षेत्रातील बदलाने एक वेगवान वळण घेतले आहे. अश्मयुगीन काळापासून लिखित माध्यमाचा जो प्रवास सुरू झाला, त्याच्या विविध टप्प्यांचा आणि कालखंडांचा विचार करता येणाऱ्या पुढील काही वर्षांत प्रचंड वेगाने क्रांती होणार आहे, हे मात्र नक्की.

अमेरिकेसारख्या आधुनिक राष्ट्रांच्या विकासाकडे एक दृष्टिक्षेप टाकला तर साहित्याचा सर्वसामान्य लोकांपर्यंत झालेला प्रसार हा त्या राष्ट्राच्या समृद्धीत महत्त्वपूर्ण ठरतो. गेल्या काही वर्षांत लेखकाने तयार केलेले साहित्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याच्या माध्यमांमध्ये इंटरनेटच्या युगात आमूलाग्र बदल झालेले दिसून येतात. पुस्तके विक्री करणाऱ्या वेबसाइटवरून इंग्रजी भाषेतील कोणतेही पुस्तक घरपोच उपलब्ध होते. पारंपरिक दुकानांच्या माध्यमातून पुस्तके वितरण



> भारतीय साहित्य ई-बुक स्वरूपात जतन करण्याचे काम विविध पातळ्यांवर सुरू आहेच, पण त्याला योग्य दिशा देऊन एकाच ठिकाणी ते सर्व उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

करण्यासाठी लागणारे भांडवल, मनुष्यबळ यामध्ये दिवसेंदिवस खर्चाचा ताळमेळ हा व्यस्त प्रमाणात होताना दिसून येतोय आणि याचाच परिणाम म्हणून पुस्तकांची दुकाने बंद पडत चालली आहेत. गेल्या तीन-चार वर्षांत कॉम्प्युटर आणि विविध टॅब्लेट्सच्या प्रवेशाने वाचकांना 'ई-बुक्स'ची सवय लागत आहे.

ई-बुक म्हणजे कोणत्याही पुस्तकाची इलेक्ट्रॉनिक आवृत्ती. ई-बुक तयार करून वितरित करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा विचार करता कमी किमतीमध्ये जास्तीत जास्त साहित्य हे जगभरातील वाचकांना त्यांच्या हातात क्षणार्धात उपलब्ध होत आहे. ॲमेझॉन.कॉमची अलीकडची आकडेवारी असे दाखवून देते, की ई-बुक्सचा खप हा परंपरागत पुस्तकापेक्षा जवळजवळ दीड पटीने वाढला आहे.

भारताचा विचार करता पाश्चात्त्य देशांत विकसित झालेले तंत्रज्ञान सर्वसाधारण नागरिकांच्या हाती साधारण ३-४ वर्षांनंतर येते, असा आतापर्यंतचा इतिहास होता. पण गेल्या काही वर्षांत यात आमूलाग्र बदल होताना दिसून येत आहे. भारतीय साहित्य जगभरातील वाचकांपर्यंत जगभर पोहोचविण्याच्या उद्देशाने बुकगंगा. कॉमने पुढाकार घेतला. भारतीय साहित्यातील अनेक प्रकाशकांची सुमारे पन्नास हजारच्यावर पुस्तके विक्रीसाठी थोड्याच कालावधीत उपलब्ध करून देण्यात आली. त्याबरोबर हजारो पुस्तके ही ई-बुक्स स्वरूपात उपलब्ध होत आहेत. नवीन पुस्तके प्रकाशित होत असताना ती ई-बुकच्या माध्यमातून क्षणार्धात उपलब्ध करून दिली जात आहेत. ई-बुक करण्यासाठी लेखक, प्रकाशकांनी आपले साहित्य छापील वा पीडीएफ स्वरूपात बुकगंगाकडे पाठवल्यानंतर ती ई-बुक स्वरूपात बुकगंगा रीडरच्या माध्यमातून वाचकांना उपलब्ध करून दिली जातात. पायरसी थांबवण्यासाठी विशेष काळजी घेतली जाते. ई-बुक साहित्य प्रकाशित आणि वितरित करताना छपाईचा खर्च येत नसल्याने ई-बुकची किंमत कमी ठेवणे शक्य होते. लेखक, प्रकाशकांना त्यांचे पुस्तक विक्री होताक्षणी समजू शकते आणि व्यवहारात पारदर्शकता राखता येते, जे पूर्वी सहजी शक्य नव्हते. लेखकांना ६० टक्के रॉयल्टी देणेसुद्धा आता शक्य झाले आहे. पुस्तक वाचण्याबरोबरच त्या पुस्तकाच्या संदर्भातील दृक्श्राव्य माध्यमातून त्या साहित्याचा आस्वाद घेणे आता सहजी शक्य होणार आहे. एखादी कविता स्वतः कवी आपल्या आवाजातून पेश करू शकेल आणि ती वाचकांपर्यंत पोहोचवू शकेल. यामुळे हजारो पुस्तके आता सहजी हातातून वागवणे शक्य होत आहे. भारतीय साहित्य ई-बुक स्वरूपात जतन करण्याचे काम विविध पातळ्यांवर सुरू आहेच, पण त्याला योग्य दिशा देऊन एकाच ठिकाणी ते सर्व उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. ग्रंथालयातील जुने ग्रंथ आता ई-बुक स्वरूपात रूपांतरित करणे अत्यावश्यक आहे. यासाठी विविध उद्योगसमूहांचे आर्थिक पाठबळ मिळवणे शक्य होऊ शकते. ....**पान ६ पाहा**

» पान १ वरून

# साहित्याचा ई-प्रवाह!

छोट्या गावांतील शाळांमधून कॉम्प्युटर आणि इंटरनेटचा वापर वाढतो आहे. शाळा- महाविद्यालयांमधून अभ्यासक्रमाची व संदर्भग्रंथांची ई-लायब्ररी बुकगंगा.कॉमच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. याच तंत्रामुळे जगभरातील विविध संदर्भग्रंथांचा खजिना आता एका क्लिकवर चंद्रपूर जिल्ह्यातील छोट्या गावातही उपलब्ध असेल. संगीत क्षेत्रात पायरसीमुळे कलाकारांना योग्य तो मोबदला मिळत नाही. ई-बुकच्या येणाऱ्या युगात पायरसी झालेली पुस्तके रस्त्यावर विक्रीसाठी उपलब्ध होऊ नयेत, म्हणून लेखक-प्रकाशकांनी आपले साहित्य वेळीच वाचकांच्या हातात ई-बुक स्वरूपात योग्य किमतीमध्ये सहजी उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. वेळीच यावर कृती केली गेली नाही तर पुस्तकांच्या क्षेत्रातील पायरसी रोखणे अवघड बनेल. ई-बुक विकत घेऊन वाचायची मानसिकता विकसित करणेही खूप महत्त्वाचे आहे.

गेल्या वेळी ठाणे येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात 'बुकगंगा'चा एकच स्टॉल असा होता की जिथे पुस्तके नव्हती, तरीही ई-बुक्स पाहण्यासाठी कॉम्प्युटरसमोर वाचकांनी तोबा गर्दी केली होती. ते दृश्य पाहता, येत्या काही वर्षांत विविध साहित्य संमेलनांमध्ये ई-बुक्सचेसुद्धा स्टॉल पाहायला मिळतील. तरुणवर्गात वाचन संस्कृतीची वाढवायची असेल तर त्याच्या माध्यमातून साहित्य पोहोचवणे ही काळाची गरज आहे. पुस्तकांचा दिवसेंदिवस वाढणारा खप हा वाचन संस्कृती वाढत असल्याचाच निदर्शक आहे. आज फोनवर ऑर्डर करून पुस्तके घरपोच मिळतात किंवा आपल्या कॉम्प्युटरवर डाउनलोड करून घेता येतात. याचमुळे पुण्या-मुंबईसारख्या शहरांच्या बाहेर छोट्या गावांतूनही साहित्य उपलब्ध होत आहे.



भारत हा आर्थिक महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे सांगितले जाते; पण हे साध्य करण्यासाठी गरज आहे ती गतिमान कार्यपद्धतीचा अवलंब करून सकारात्मक दृष्टीने तंत्रज्ञान क्षेत्रात होणाऱ्या बदलांकडे पाहण्याची. हे बदल आत्मसात केले तर नजीकच्या काळात छोट्या गावांतील लेखक आपले साहित्य आता ई-बुक स्वरूपात वाचकांपर्यंत उपलब्ध करून देऊ शकेल. जसे हॅरी पॉटरसारख्या पुस्तकांच्या जगभर अनेक आवृत्त्या निघत असतानाच मराठी साहित्यकृती त्याच धर्तीवर विविध भाषांमध्ये उपलब्ध होण्यास फार काळाची वाट पाहावी लागणार नाही.

(संस्थापक - सीईओ, बुकगंगा.कॉम
फिलाडेल्फिया, अमेरिका)
mandar@joglekar.com